## पोलीस अधीक्षक कार्यालय,जळगाव

फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११

Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


जनसंपर्क अधिकारी

दि.१५/०४/२०२६.

**विषय :- ATM चोरी करणारे आंतरराज्यीय अट्टल गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखा जळगाव च्या ताब्यात.**

| पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | रिपोर्ट देणारे |
|---|---|---|
| जळगाव शहर पो.स्टे. | 88/2026, भा.न्या.सं.2023 चे क. 303(2) , 334,3(5) प्रमाणे. | पो.उप.निरी.शरद बागल, स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव. |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **गुन्हा दाखल तारीख व वेळ** | **गुन्हा उघड तारीख** |
| गोपनीय व तांत्रीक | दि.03.04.2026 रोजी 21/00 वा. | दि.14/04/2026 |

**गुन्हे उघडकीस आणणारे पोलीस अधिकारी व अंमलदार.**

मा.श्री.महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगांव.
मा.श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक,जळगांव परिमंडळ.
मा.श्री.नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी,जळगांव उपविभाग, जळगांव.
यांचे मार्गदर्शनाखाली

श्री.राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक शरद बागल, पोउपनिरी सोपान गोरे, पोउपनिरी शेखर डोमाळे, पोउपनिरी जितेंद्र वल्टे, ग्रेपोउपनि रविंद्र नरवाडे, सहा.फौज.अतुल वंजारी, पो.हे.कॉ.विजय पाटील, अक्रम शेख, नितीन बाविस्कर, मुरलीधर धनगर, लक्ष्मण पाटील,सलीम तडवी, विनोद पाटील, प्रविण भालेराव, पो.ना.अ.किशोर पाटील,विकास सातदिवे, श्रीकृष्ण देशमुख आणि पो.अ.रवींद्र कापडणे, राहुल रगडे, सिध्देश्वर डापकर,राहुल वानखेडे, प्रशांत परदेशी, छगन तायडे, हेंमत पाटील, रविंद्र चौधरी, सचिन घुगे, चालक दिपक चौधरी, बाबासाहेब पाटील, प्रविण हिवराळे, दर्शन ढाकणे, रिझवान शेख, प्रदिप चौरे, तांत्रीक मदत गौरव पाटील, मिलींद जाधव, ईश्वर पाटील, प्रदिप सपकाळे, पंकज पाटील, मुबारक देशमुख, कुंदनसिंग बयास.

| | |
|---|---|
| **आरोपीचे नांव व पत्ता :-** | १) मोबीन आत्मज मिला वय २८ वर्ष रा.बेगी नाजर, ता.नकुर जि.सऱ्हानपुर, उत्तर प्रदेश<br>२) अब्दुल करीम नुर हसन वय ५२ वर्ष रा.तितरोद ता.नकुर जि.सऱ्हानपुर उत्तर प्रदेश |
| **आरोपी अभिलेख :-** | 1) आरोपी क्रंमाक 01 मांबीन मिला<br>1. सोनीपत पो.स्टे.उत्तर प्रदेश गु.र.क्रं.97/2015 भादवि कलम 307,332,336,<br>2. घोना सीटी पो.स्टे.उत्तर प्रदेश गु.र.क्रं.385/2014 भादवि कलम 324,427<br>2) आरोपी क्रंमाक 02 अब्दुल करीम नुर हसन<br>1. |
| **जप्त मुद्देमाल :-** | 1) 50,000/- रुपये किंमतीची हिरो स्प्लेंडर मोटरसायकल जु.वा.कि.अं.<br>2) 10,000/- रुपये किंमतीचा रेडमी मोबाईल फोन जु.वा.कि.अं.<br>3) 0700/- रुपये रोख<br>4) 0500/- रुपये किंमतीचे 02 हेल्मेट<br>------------------------------------------------<br>एकुण 61,200/- |

**-: गुन्हयाची थोडक्यात हकिगत :-**

दिनांक :-०३/०४/२०२६ रोजी फिर्यादी नामे हरीष विजय गांधी वय ३७ वर्ष व्यवसाय ब्रँच मॅनेजर रा. रिंग रोड जळगाव यांनी फिर्याद दिली की, जळगाव शहरातील पोलन पेठ, सत्यम प्लाझा कॉप्लेक्स येथील इक्वीटस स्मॉल बँक चे ATM मशीन येथुन कोणीतरी ०४ अज्ञात चोरटयाने चोरुन नेल्याबाबत फिर्याद दिल्याने अज्ञात आरोपी याचे विरुध्द गु.र.नं. ८८/२०२६ भा.न्या. संहिता कलम ३०३(२),३३४,३(५). प्रमाणे जळगाव शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## -: पोलीस कारवाई आणि तपास:-

सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी मा.श्री.महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगांव यांनी श्री राहुल गायकवाड, वरीष्ठ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जळगाव. यांना आदेशीत केले होते. याप्रमाणे ATM चोरीच्या गुन्हयांचा समांतर तपास करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.राहुल गायकवाड यांना बातमी मिळाली होती की, सदर ATM चोरी करणारे संशयीत परत ATM ची चोरी करण्यासाठी जळगाव शहरात आलेले आहेत. अशी खात्रीशीर गोपनीय बातमी प्राप्त झाल्याने स्थानीक गुन्हे शाखा जळगाव कडील पथकाने दिंनाक १४/०४/२०२६ रोजी मन्यारखेडा कडे जाणाऱ्या रोडवरुन ताब्यात घेतले होते. त्यांच्या ताब्यात दाखल गुन्हयात ATM चोरतांना वापरलेली मोटरसायकल मिळुन आली होती. त्यांनी सदर गुन्हा त्यांच्या इतर ०३ साथीदारसह केल्याची कबुली दिली आहे. तसेच नमुद आरोपीतांनी सदरचा गुन्हा करण्यासाठी शनीपेठ पोलीस स्टेशन हद्दीतील महींद्रा पिक अप गाडी चोरल्याची कबुली दिली असुन, सदर गाडीचा ATM चोरी करण्यासाठी वापर केला असल्याची कबुली दिली आहे. **नमुद आरोपीतांना जळगाव शहर पोलीस स्टेशन च्या ताब्यात दिले असुन, सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सुरेश आव्हाड करीत आहेत.**

तसेच सदर मिळुन आलेल्या संशयीत ०२ आरोपीत इसम व त्यांचे इतर पाहीजे असलेले ०३ साथीदार नामे फरहान, अकबर मुजाहीद (पुर्ण नाव माहीत नाहीत) सर्व रा.बेगी ता.नकुर जि सरहानपुर राज्य उत्तरप्रदेश यांनी यापुर्वी भारतभर तसेच महाराष्ट्र राज्यात तसेच झारखंड येथे ATM चोरी चे गुन्हे केले असल्याची कबुली दिली आहे. त्यांचा अभिलेख खालीलप्रमाणे

१) शनीपेठ पोलीस स्टेशन जि.जळगाव महाराष्ट्र गु.र.क्रं.६३/२०२६ भा.न्या.सं.2023 चे कलम ३०३ (२) प्रमाणे
२) जळगाव शहर पोलीस स्टेशन महाराष्ट्र गु.र.क्रं.८८/२०२६ भा.न्या.सं.2023 चे क. 303(2) , 334,3(5) प्रमाणे.
३) यवत पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण महाराष्ट्र गु.र.क्रं.197/2026 भा.न्या.सं.2023 चे कलम 305 (2) प्रमाणे
४) यवत पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण महाराष्ट्र गु.रक्रं. 198/2026 भा.न्या.सं.2023 चे कलम 303(2) प्रमाणे
5) झारखंड ------

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव.**